जा.क्र. / जिपवा / मबाक / आस्था-१/३०९/२०२३
महिला व बाल कल्याण विभाग, जि. प. वाशिम
दिनांक- ०३/०३/२०२३

प्रति,

बाल विकास प्रकल्प अधिकारी,
ए. बा. वि. से. यो. प्रकल्प, सर्व

**विषय**- अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविकांमधून निवडीव्दारे पर्यवेक्षिका या पदाची भरती करण्यासाठी अर्ज मागविणेबाबत.

**संदर्भ**-जिल्हा निवड समिती, वाशिम बैठक दिनांक १५.०२.२०२३ मधील निर्देश.

जिल्हा परिषद, वाशिम एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत मानसेवी अंगणवाडी सेविका किंवा मिनी अंगणवाडी सेविका या पदावर कार्यरत असणाऱ्या महिला उमेदवारांमधून मर्यादित परीक्षेच्या गुणांकानुसार निवडीव्दारे अंगणवाडी पर्यवेक्षिका या पदाची पदभरती करण्याच्या अनुषंगाने दिनांक १५.०२.२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झालेली असून सदर बैठकीतील निर्णयानुसार पात्र मानसेवी अंगणवाडी सेविका किंवा मिनी अंगणवाडी सेविका यांच्याकडून विहीत नमुन्यात अर्ज खालील रिक्त पदांनुसार मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज संबंधित उमेदवाराने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे परिपूर्ण भरून **दिनांक १७.०३.२०२३** रोजी पर्यत सादर करावेत. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सदर अर्जाची पडताळणी करून खासदूतामार्फत सदर अर्ज विहीत प्रपत्रामध्ये यादीसह **दिनांक २१.०३.२०२३** रोजी पर्यत या कार्यालयास सादर करावे.

विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कटाक्षाने नोंद घेण्यात यावी. तसेच सदर पत्र व जाहिरात आपल्या अनिधनस्थ सर्व अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका यांच्या निदर्शनास आणून देऊन अहवाल तात्काळ उलट टपाली सादर करावा.

०१. रिक्त पदे

| | अनु. जाती | अनु. जमाती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | इडब्लू एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ०३ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०४ | ०२ | ०९ | २२ |
| टिप- वरील पैकी एक पदे दिव्यांग उमेदवारांसाठी राखिव.<br>दिव्यांगत्वाचा प्रकार- HH, OL, LC, DW, AAV, LC, ASD (M), MI (M), MD including a to d | | | | | | | | | | | |

E:\ICDS-2022\भरती-2022\New Microsoft Word Document.docx

०२. शैक्षणिक अर्हता-

०१. अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका या पदावर १० वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा.

०२. ४५ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या

०३. पदवी धारण केलेल्या

०३. इतर अटी व शर्ती-

| | |
|---|---|
| ०१. | वाशिम जिल्ह्यातील रहिवाशी असल्याबातचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले आदीवास प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराने अर्ज सोबत सादर करणे आवश्यक राहील. |
| ०२. | अर्जासोबत संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी संबंधित अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका यांनी सदर पदावर १० वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ०३. | मागास प्रवर्गातील उमेदवाराने मागास प्रवर्गातून अर्ज सादर करतांना अर्जासोबत समक्ष प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (जात वैधता प्रमाणपत्र असल्यास अर्जासोबत जोडावे.) |
| ०४. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय दिन. १२.१२.२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधीत उमेदवारांना सेवेतुन कमी करण्यात येईल. |
| ०५. | वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले सन २०२२-२०२३ साठी वैध असलेले प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. जर अर्जदार सन २०२२-२०२३ साठी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र प्राप्त करत नसतील तर अशा उमेदवारांना आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही व त्यांचा अर्ज बाद ठरविण्यात येईल. |
| ०६. | निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे (उदा:- शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, पडताळणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक ती सर्व कागदपत्र) सादर करणे बंधनकारक राहील. |
| ०७. | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| ०८. | अर्जातील दाव्यानुसार मुळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवाराची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल. |
| ०९. | सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसुचना क्रमांक एस.आर.व्ही /२००० /प्र.क्र.१७ /२००० /१२ दि. २८ मार्च २००५ व शासन परीपत्रक एसआरव्ही/२०००/प्र.क.१७/२००० दि. १ जुलै २००५ अन्वये विहित केलेनुसार लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना -अ आवश्यक अर्हता म्हणून भरती म्हणून भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहीत असल्यास अर्जात या बाबत स्पष्ट उल्लेख करावा. |
| १०. | निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य |

| | |
|---|---|
| | ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ११. | चारित्र-पुर्वचारित्र पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| १२. | निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादी यांची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. |
| १३. | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-४०९/ प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/ पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट- ड) पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असेल पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि.१३ ऑक्टोंबर १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| १४. | गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. |
| १५. | दिव्यांग प्रवर्गासाठी किमान ४० टक्के दिव्यंगत्व असल्याचे वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. |
| | दिव्यांगासाठी एक पद राखीव ठेवण्यात आलेले असून गुणवत्तेनुसार ज्या प्रवर्गातून दिव्यांग उमेदवार पात्र होईल त्या प्रवर्गातून सदर दिव्यांगाचे पद भरण्यात येईल. |
| १६. | अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा ४५ वर्षाचे आतील अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका अर्ज करण्यास पात्र राहतील. |
| १७. | समान गुण उमेदवारास समान गुण मिळाल्यास शासन पुरकपत्र दिनांक ०२.१२.२०१७ व ०४.०५.२०२२ नुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल. |
| १८. | उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेली सर्व कागदपत्र मूळ कागदपत्रावरून संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना साक्षांकित करून सादर करणे आवश्यक राहील. |
| १९. | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस२०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरकपत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| २०. | अर्जासोबत खालील कागदपत्र सादर करावी लागतील.<br>०१. परिपूर्ण अर्ज भरावा. अर्जात खाडाखोड केली असल्यास अर्ज बाद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.<br>०२. आदिवास प्रमाणपत्र.<br>०३. मागास प्रवर्गातून अर्ज सादर केल्यास जात प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र.<br>०४. इडब्लूएस प्रवर्गातून अर्ज सादर केल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.<br>०५. लागू असल्यास उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे सन २०२३ -२४ या आर्थिक वर्षापर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र.<br>०६. उपलब्ध असल्यास संगणक अर्हता प्रमाणपत्र.<br>०७. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती. |

सोबत- अर्जाचा नमुना व विवरणपत्र.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक),
जिल्हा परिषद, वाशिम

प्रत-

०१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांना माहितीस्तव सविनय सादर.

०२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना माहितीस्तव सविनय सादर.

०३. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

०४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला, जि. अकोला

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक),
जिल्हा परिषद, वाशिम